# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ
## MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES
म्हसरुळ, दिंडोरी रोड, नाशिक - ४२२ ००४
Mhasrul, Dindori Road, Nashik – 422 004.

**Phone:** 0253-2539175 / **EPABX:** 0253-2539100 - 300 / **Fax:** 0253-2539176
**E-mail:** pro@muhsnashik.com / **Web:** www.muhsnashik.com


क्र. मआविवि/पीआर/८३९/२०११ — <u>वृत्त प्रसिध्दीसाठी</u> — दि.२१ सप्टेंबर २०११

## आरोग्य विद्यापीठाकडे आखिल भारतीय पश्चिम विभाग आंतरविद्यापीठ महिला लॉन टेनिस स्पर्धेचे यजमानपद

**मा.कुलगुरु प्रा.डॉ. अरुण जामकर**

**नाशिक (दि.२१)** – आखिल भारतीय पश्चिम विभाग आंतरविद्यापीठ महिला लॉन टेनिस स्पर्धेचे यजमानपद महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने स्वीकारले असल्याची माहिती विद्यापीठाचे मा.कुलगुरु प्रा.डॉ. अरुण जामकर यांनी दिली.

याबाबत अधिक माहिती देतांना मा. कुलगुरुंनी सांगितले की, या आखिल भारतीय पश्चिम विभाग आंतरविद्यापीठ महिला लॉन टेनिस स्पर्धाचे यजमानपद महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने स्वीकारले असून या स्पर्धा नाशिकमधील विविध टेनिस कोर्टसवर घेण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले की, जीवनातील ताणतणाव घालविण्यासाठी उपलब्ध वेगवेगळया उपायांपैकी खेळ हा उत्तम उपाय असून त्याचे शालेय, महाविद्यालयीन पातळीवर विविध स्पर्धाचे वेगवेगळया स्तरावर आयोजन करण्यात येते. यामुळे निश्चितच अंगी खेळाडूवृत्ती येऊन कठीण प्रसंगांना तोंड देण्याची, संकटांचा सामना करण्याची क्षमता अंगी येते. खेळांचे हे महत्व लक्षात घेऊन विद्यापीठ स्तरावर जे प्रयत्न केले जातात. त्याचाच एक भाग म्हणून या स्पर्धाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती त्यांनी दिली.

विद्यापीठाचे प्रति कुलगुरु डॉ. अशोक कुलकर्णी कुलसचिव डॉ.आ.ना. सूर्यकर यांनी सांगितले की, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने आखिल भारतीय पश्चिम विभाग आंतरविद्यापीठ महिला लॉन टेनिस स्पर्धामध्ये महाराष्ट्र, गोवा, गुजरात, मध्य प्रदेश आणि राजस्थान या पाच राज्यांतील ७९ विद्यापीठांचे संघ सहभाग नोंदविणार आहे.

याबाबत अधिक माहिती देतांना विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.आ.ना. सूर्यकर यांनी सांगितले की, भारतीय विश्वविद्यालय संघ, नवी दिल्ली (Association of Indian Universities) यांनी आखिल भारतीय पश्चिम विभाग आंतरविद्यापीठ महिला लॉन टेनिस स्पर्धा आयोजनाची जबाबदारी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठावर सोपविली आहे. या स्पर्धा दि.१६ ऑक्टोबर २०११ ते दि. १९ ऑक्टोबर २०११ कालावधीत आयोजित करण्यात आल्या आहे. या स्पर्धा नाशिकमधील नाशिक जिमखाना, एन.डी.टी.ए. आणि निवेक येथील टेनिस कोर्टवर खेळविल्या जाणार आहे. विद्यापीठाचे मा.कुलगुरु प्रा.डॉ. अरुण जामकर स्वतः लॉन टेनिसचे चांगले खेळाडू असून त्यांनी नाशिककरांना टेनिस स्पर्धांची मेजवाणी उपलब्ध करुन दिली असून त्याचा लाभ घ्यावा अशी त्यांनी माहिती दिली.

या स्पर्धा सुरळितपणे पार पडण्याच्या दृष्टीने नियोजन व रुपरेषा आखण्याच्या दृष्टीकानोतून गठित करण्यात आलेल्या समिती सदस्यांच्या बैठकीचे विद्यापीठात आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांचे प्रशिक्षक, प्रा.दिलीप लोंढे, प्रा.माणिक गायकवाड, प्रा.संतोष पवार, प्रा.डॉ. तोंडे, प्रा.डॉ.ललिता पूरकर आदी उपस्थित होते.

**कुलसचिव**